Review Of Research
Vol. 3, Issue. 2, Nov. 2013
ISSN:-2249-894X Available online at www. lbp.world

ORIGINAL ARTICLE

# महाराष्ट्रातील अंधांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास

*प्रा.कैलास जगन्नाथ शिवदे*

अर्थशास्त्र विभाग, एच.पी.टी. आर्टस् अँड आर.वाय.के. सायन्स कॉलेज, नाशिक.

***प्रस्तावना :***

अंध व्यक्ती या महाराष्ट्रभर विखुरलेल्या असून बहुसंख्य अंधांचे पालक देखील अशिक्षित असतात. अंध व्यक्तीची त्यांच्या घरातल्या लोकांकडून तसेच समाजाकडूनही उपेक्षा होते. अंध व्यक्ती काय करु शकतात? त्यांच्या समस्या कोणत्या? त्यांच्यातल्या सूप्त क्षमता ओळखून त्यांना उत्तेजन कसे द्यावे? अंधांना व्यवसायिक प्रशिक्षण कसे व कोणते द्यावे? त्यांचे पुनर्वसन करुन सन्मानाने जीवन जगायला कसे शिकवावे? त्यांना शिक्षण कसे द्यावे? इ. प्रश्नांची व्यक्तीगत पातळीवर सोडवणूक होणे तितकेसे शक्य नसल्याने या सर्व प्रश्नांची उत्तरे संस्थात्मक पातळीवरुन शोधावी लागतात. म्हणून अंधांसाठी काम करणाऱ्या संस्था स्थापन होणे गरजेचे आहे.

अर्थात अलीकडील काळात सर्वशिक्षा अभियानांतर्गत सर्वांना शिक्षणाची समान संधी या तत्वानुसार अंध विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी स्वतःच्या गावापासून व घरापासून दूर न ठेवता स्वतःच्या गावातच शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली जाते. त्यासाठी विविध शाळांमध्ये अंध विद्यार्थ्यांना शिकवण्याचे खास प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांची नेमणूक केली आहे. त्यामुळे अंधांसाठी स्वतंत्र शैक्षणिक संस्थांची गरज भविष्यात कमी होईल असे वाटते. असे असले तरी अंधांना व्यवसायिक प्रशिक्षण देणे, त्यांचे पुनर्वसन करणे, त्यांना गतिक्षमतेचे प्रशिक्षण देणे, (पांढऱ्या काठीच्या सहाय्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुरक्षितपणे जाण्याचे प्रशिक्षण) इ. साठी संस्था निर्माण होणे आवश्यक आहे. 1950 ते 2011 या काळात महाराष्ट्रातील अंधांसाठीच्या संस्थांची संख्यात्मक व गुणात्मक प्रगती कशी झाली, याचा सविस्तर आढावा पुढे घेतला आहे.

**उद्दिष्ट्ये :**

1) महाराष्ट्रातील अंधासाठी कार्य करणाऱ्या संस्थांचा अभ्यास करणे.
2) अंधांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांचा प्रादेशिक समतोल तपासणे.
3) महाराष्ट्रातील अंधांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या प्रकारांचा अभ्यास करणे.
4) महाराष्ट्रातील अंधांसाठी कार्य करणाऱ्या संस्थाच्या कार्याचा अभ्यास करणे.
5) महाराष्ट्रातील अंधांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगतीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

संशोधन म्हणजे पद्धतशीर अभ्यास, पद्धतशीर अभ्यास करण्यासाठी संशोधक संशोधन पद्धतींचा अवलंब करतात. यासाठी प्राथमिक माहिती आणि दुय्यम माहिती हे दोन स्त्रोत वापरले जातात. महाराष्ट्रातील अंधांसाठी कार्य करणाऱ्या संस्थाबद्दल संशोधन करण्यासाठी दुय्यम माहितीचा स्त्रोत उपयोगात आणला आहे. यामध्ये अंधांसाठी कार्य करणाऱ्या वेगवेगळ्या संस्थांच्या वार्षिक अहवालांचा अभ्यास करुन संदर्भ पुस्तकांचाही आढावा या ठिकाणी घेण्यात आला आहे. तसेच 2011 साली नॅब युनिट महाराष्ट्र या अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थेने महाराष्ट्रातील अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांच्या संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगतीबाबत प्रश्नावलीच्या सहाय्याने जे सर्वेक्षण केले होते त्यातून उपलब्ध झालेल्या आकडेवारीचाही वापर या संशोधनासाठी करण्यात आला आहे.

**संशोधन मर्यादा :**

1) हे संशोधन दुय्यम आकडेवारीवर आधारित आहे.
2) महाराष्ट्रात जरी एकूण 35 जिल्हे असले तरी या संशोधनासाठी केवळ 27 जिल्ह्यांचीच दुय्यम आकडेवारी उपलब्ध झाली आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**


1) अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थाबाबत अस्तित्वात असलेल्या धोरणात बदल करणे किंवा नवीन सुयोग्य धोरण ठरविण्यासाठी सरकारच्या दृष्टीने हे संशोधन महत्वाचे आहे.
2) अंधांसाठी इतर राज्यात काम करणाऱ्या संस्थांच्या कार्याचा अभ्यास करताना दिशा दाखविण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण आहे.
3) यापुढे जे संशोधक अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांचा अभ्यास करतील त्यांना हे संशोधन उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरु शकेल.
4) अंधांसाठी काम करणाऱ्या अप्रगत संस्थांना प्रगत संस्थांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन आपल्या कार्यात सुधारणा करायला प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.
5) महाराष्ट्रात अंधांसाठी काम करणाऱ्या संस्था आणि भारताच्या इतर राज्यात अंधांसाठी काम करणाऱ्या संस्था यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.
6) अंधांसाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील संस्था आणि अविकसित, विकसनशील व विकसित देशांतील अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरु शकते.

**संस्थेचे प्रकार**

**तक्ता क्र. 1**

| अ.क्र. | संस्थेचे प्रकार | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| अ | खासगी | 86 | 78.90% |
| 1 | अनुदानित | 29 | 26.61% |
| 2 | विना अनुदानित | 57 | 52.29% |
| ब | सरकारी | 23 | 21.10% |
| | एकूण | 109 | 100% |

**आलेख क्र. 1**




संदर्भ : महाराष्ट्र राज्य नॅब शाखा, नाशिक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार वर्ष 2011.

**निष्कर्ष :**

वरील आकडेवारी वरुन असे दिसते की,

1) 2011 साली अंधांसाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील संस्थांची एकूण संख्या 109 होती.
2) महाराष्ट्रातील 78.90% संस्था या खाजगी होत्या तर केवळ 21.10% संस्था या सरकारी होत्या. एकूण 86 खाजगी संस्थापैकी केवळ 29 संस्थाच अनुदानित असून उरलेल्या 57 संस्था या विनाअनुदानित आहेत. यावरुन सरकारी पातळीवर अंधांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक असणाऱ्या संस्था तुलनेने कमी प्रमाणात स्थापन करण्यात आलेल्या आहेत हे दिसून येते. तसेच खाजगी संस्थांमध्येही विनाअनुदानित संस्थांची संख्या एकूण खासगी संस्थांच्या निम्म्याहून अधिक आहे. म्हणजेच अंधांच्या पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या संस्थांना सरकारकडून आर्थिक पाठबळ मिळत नसल्याने या कामासाठीची आर्थिक तरतूद या संस्थांना स्वतःलाच करावी लागते.

**सारांश**


अंधांच्या पुनर्वसनासाठी संस्थांच्या माध्यमातून काम करण्याच्या दृष्टीने सरकारचे पुरेसे लक्ष नाही हे स्पष्ट दिसून येते.

**महाराष्ट्रात अंधांसाठी स्थापन झालेल्या संस्थांची संख्या**

**तक्ता क्र. 2**

| अ.क्र. | दशक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 1950–60 | 12 | 11.00% |
| 2 | 1960–70 | 15 | 13.76% |
| 3 | 1980–90 | 24 | 22.02% |
| 4 | 1990–2000 | 33 | 30.28% |
| 5 | 2000–2011 | 19 | 17.43% |
| | एकूण 60 वर्षाची आकडेवारी | 103 | 94.49% |

**आलेख क्र. 2**




6 संस्थांच्या स्थापनेच्या वर्षाची माहिती उपलब्ध नाही.

संदर्भ : महाराष्ट्र राज्य नॅब शाखा, नाशिक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार वर्ष 2011.

**निष्कर्ष :**

1950–1960 ते 1990–2000 या कालावधीत महाराष्ट्रात अंधांसाठी काम करणाऱ्या ज्या संस्था स्थापन झाल्या त्यांची संख्या आणि टक्केवारी वाढलेली दिसते. 1950–1960 च्या दशकात केवळ 12 संस्था म्हणजेच (11%) संस्था स्थापन झाल्या

तर 1990 ते 2000 या दशकात एकूण 33 संस्था म्हणजे (30.28%) संस्था स्थापन झाल्या. 2000 ते 2011 या काळात अंधांसाठी स्थापन झालेल्या संस्थांची संख्या आणि प्रमाण कमी झालेले आहे. अनुक्रमे 19 व 17.43%.

**सारांश**


1) अंधांसाठी काम करण्यासाठी स्थापन झालेल्या संस्थांची संख्या 1950–60 या दशकापासून 2000–2011 या दशकापर्यंतच्या काळात वाढलेली आहे.
2) 70 ते 80 या दशकात अंधांसाठी काम करणाऱ्या संस्था स्थापन झालेल्या आढळत नाही.

**महाराष्ट्रातील अंधांसाठी काम करणाऱ्या नोंदणीकृत आणि बिगर नोंदणीकृत संस्था**

**तक्ता क्र. 3**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | नोंदणीकृत | 98 | 89.91% |
| 2 | बिगर नोंदणीकृत | 04 | 03.67% |
| 3 | माहित नाही | 07 | 06.42% |
| | एकूण | 109 | 100% |

**आलेख क्र. 3**




संदर्भ : महाराष्ट्र राज्य नॅब शाखा, नाशिक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार वर्ष 2011.

**निष्कर्ष :**

1) अंधांसाठी काम करणाऱ्या एकूण संस्थापैकी जवळजवळ 90 संस्था नोंदणीकृत आहेत. तर केवळ 3.67% संस्था या बिगर नोंदणीकृत आहेत.
2) एकूण 7 संस्थांची 6.42% नोंदणीबद्दलची माहिती मिळालेली नाही. यावरुन अंधांसाठीच्या बहुतांशी संस्था या नोंदणीकृत आहेत हे स्पष्ट होते.


**सारांश :** संस्था नोंदणीकृत असणे ही चांगली गोष्ट आहे.

**संस्थांच्या इमारतीची मालकी**

**तक्ता क्र. 4**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | स्वतःची | 52 | 47.71% |
| 2 | भाडेतत्वावर | 45 | 41.28% |
| 3 | सरकारी | 7 | 06.42% |
| 4 | खासगी | 5 | 04.59% |
| | एकूण | 109 | 100% |

**आलेख क्र. 4**




संदर्भ : महाराष्ट्र राज्य नॅब शाखा, नाशिक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार वर्ष 2011.

**निष्कर्ष :**

1) केवळ 47.71% म्हणजे 52 संस्थांची स्वमालकीची इमारत आहे.
2) निम्म्यापेक्षा जास्त संस्थांकडे स्वतःच्या मालकीची इमारत नाही.
3) एकूण संस्थापैकी 41.28% संस्थांच्या इमारती भाडे तत्वावर आहे.
4) केवळ 7 संस्थांकडेच 6.42% सरकारी इमारती आहे.
5) 5 संस्थाकडे 4.59% खासगी इमारती आहेत.


**सारांश :**

स्वमालकीची इमारत असल्याशिवाय संस्थेला आवश्यक ती प्रगती करणे शक्य होत नाही. तसेच गरजेनुसार इमारतीत फेरफार करण्याच्या मार्गात अडचणी निर्माण होतात. इमारत भाडे तत्वावर असल्यास संस्थेला वारंवार जागा बदलावी लागू शकते. याचा संस्थांच्या प्रगतीवर प्रतिकुल परिणाम होतो. स्वमालकीची इमारत नसल्यास संस्थेला आपला व्याप वाढवणेही शक्य होत नाही. अंधासाठी काम करणाऱ्या 41.28 संस्थांच्या इमारती अजूनही भाडे तत्वावर आहेत ही चिंतेची बाब आहे.

**सेवांचे प्रकार**
**तक्ता क्र. 5**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | अंधांचा सर्व्हे | 21 | 19.27% |
| 2 | अंधत्वाची कारणे शोधणे | 24 | 22.01% |
| 3 | डोळ्यांची तपासणी | 19 | 17.43% |
| 4 | मदतीचे वाटप | 20 | 18.35% |
| 5 | ब्रेल साक्षरता | 25 | 22.94% |
| | एकूण | 109 | 100% |

**आलेख क्र. 5**




**संदर्भ** : महाराष्ट्र राज्य नॅब शाखा, नाशिक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार वर्ष 2011

**निष्कर्ष** :

1) अंधांचा सर्व्हे करण्याचे काम केवळ 21 संस्था म्हणजेच (19.27%) संस्था करतात. म्हणजेच 80 संस्था अंधांचा सर्व्हे करण्याचे हे महत्वाचे काम करत नाहीत.
2) अंधत्वाची कारणे शोधण्याचे काम केवळ 24 संस्था म्हणजेच 22.01% इतक्या संस्था करतात. म्हणजेच 78 संस्था हे महत्त्वपूर्ण काम करत नसल्याचे आढळते.
3) अंधत्वाला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने डोळ्यांची तपासणी करणे फार महत्त्वाचे असते. पण अंधांसाठी काम करणाऱ्या एकूण संस्थापैकी केवळ 19 म्हणजे 17.43% संस्थाच हे काम करतात. अंधत्वाला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले हे काम जवळजवळ 82 संस्था करत नसल्याचे आढळते.
4) अंधांना स्वयंरोजगार, शिक्षण, पुनर्वसन, आरोग्य इ. साठी मदतीचे वाटप करणे अत्यंत महत्वाचे आहे. अंधांसाठी काम करणाऱ्या केवळ 20 म्हणजेच 18.34% संस्थाच हे काम करतात. म्हणजेच जवळजवळ 82 संस्था हे महत्वाचे काम करत नाहीत असे दिसते.
5) अंधांना शिक्षण देऊन ज्ञानाची दालने खुली करण्याच्या दृष्टीने तसेच समाजाचा एक उपयुक्त घटक म्हणून सक्षम बनविण्याच्या दृष्टीने ब्रेल साक्षरता अंधांना प्रदान करणे अत्यंत महत्वाचे आहे. ब्रेल साक्षरतेमधून अंधव्यक्ती स्वतःच्या तसेच इतर दृष्टीवान व्यक्तींच्याही जीवनात प्रकाश निर्माण करु शकतात. असे असले तरी अंधांसाठी काम करणाऱ्या केवळ 25 संस्था म्हणजे 22.94% संस्था हे काम करतात म्हणजेच 78 संस्था ब्रेल साक्षरतेचे महत्वाचे काम करत नाहीत ही अतिशय गंभीर बाब आहे.

**शैक्षणिक**

**तक्ता क्र. 6**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | सामान्य शाळेसारखे शिक्षण | 36 | 33.03% |
| 2 | घरी | —— | —— |
| 3 | विशेष शाळेत पाठवितात | 73 | 66.97% |
| | एकूण | 109 | 100% |

**संदर्भ** : महाराष्ट्र राज्य नॅब शाखा, नाशिक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार वर्ष 2011.

**निष्कर्ष** :


एकूण संस्थांपैकी 66.97% संस्था या अंध विद्यार्थ्यांना विशेष शाळेत पाठवितात. तर केवळ 33.03% संस्था या सामान्य शाळेसारखे शिक्षण देतात. अर्थात अंध व्यक्तींना समाजात एकरुप करायचे असेल तर शालेय जीवनापासूनच अंध विद्यार्थ्यांना डोळस विद्यार्थ्यांच्या सामान्य शाळांमधून शिक्षण देणे आवश्यक आहे. त्यामुळे अंधव्यक्तींना डोळस विद्यार्थ्यांची मदत होईल तसेच डोळस विद्यार्थ्यांना अंधविद्यार्थ्यांच्या सहवासात राहाण्याची संधी मिळून अंधांच्या क्षमतांचीही डोळस विद्यार्थ्यांना जाणीव होईल. त्यामुळे सामान्य शाळेत अंधांना शिक्षण देणाऱ्या संस्थाचे प्रमाण वाढणे गरजेचे आहे.

**अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांचे उपक्रम**

**तक्ता क्र. 7**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | स्वयंरोजगार | 10 | 17.43% |
| 2 | रोजगार | 15 | 13.76% |
| 3 | समुपदेश | 5 | 4.59% |
| 4 | स्वतंत्रपणे राहण्याचे कौशल्य प्रशिक्षण | 18 | 16.51% |
| 5 | सरकारचे ला | 15 | 13.76% |
| 6 | वैद्यकीय प्रमाणपत्र | 5 | 4.59% |
| 7 | विशेष तरतुद | 12 | 11.01% |
| 8 | कर्जे | 5 | 4.59% |
| 9 | बचत गट | 15 | 13.76% |
| | एकूण | 109 | 100% |

**आलेख क्र. 6**




संदर्भ : महाराष्ट्र राज्य नॅब शाखा, नाशिक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार वर्ष 2011.17

**निष्कर्ष :**

वरील तक्त्यात अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांच्या उपक्रमांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

1) 17.43% संस्था अंधांना स्वयंरोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करतात.
2) 13.76% प्रत्यक्ष रोजगार निर्माण करतात.
3) 16.51% संस्था स्वतंत्रपणे राहण्याचे कौशल्य प्रशिक्षण अंधांना देतात.
4) 13.76% संस्था सरकारचे कल्याणकारी योजना व ला अंधांना मिळवून देतात.
5) याशिवाय 13.76% संस्था अंधांना बचत गट स्थापन करण्यापासून त्या बचतगटाच्या आधारे त्यांना सक्षम बनवण्याचा प्रयत्न करतात.

**सारांश**

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, अंधांसाठी कार्यरत असलेल्या संस्था अंधांमध्ये स्वयंरोजगार, समुपदेशन, स्वतंत्रपणे राहण्याचे कौशल्य–प्रशिक्षण, सरकारचे ला मिळवून देणे, बचत गटांची स्थापना करणे इ. कार्ये या संस्था अंधांसाठी करतात.

**अंधांसाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील संस्थांची जिल्हावार आकडेवारी**
**तक्ता क्र. 8**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | संस्थांची संख्या | अ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | सोलापूर | 7 | 1 |
| 2 | पुणे | 7 | 2 |
| 3 | अहमदनगर | 5 | 3 |
| 4 | जळगाव | 4 | 4 |
| 5 | कोल्हापूर | 1 | 5 |
| 6 | नागपूर | 5 | 6 |
| 7 | लातूर | 9 | 7 |
| 8 | सातारा | 5 | 8 |
| 9 | अमरावती | 5 | 9 |
| 10 | नाशिक | 9 | 10 |
| 11 | मुंबई | 10 | 11 |
| 12 | नांदेड | 10 | 12 |

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | जालना | 3 | 13 |
| 14 | औरंगाबाद | 5 | 14 |
| 15 | बीड | 3 | 15 |
| 16 | धुळे | 5 | 16 |
| 17 | सांगली | 4 | 17 |
| 18 | हिंगोली | 4 | 18 |
| 19 | नंदुरबार | 1 | 19 |
| 21 | उस्मानाबाद | 1 | 21 |
| 22 | अकोला | 1 | 22 |
| 23 | ठाणे | 1 | 23 |
| 24 | सिंधुदुर्ग | 1 | 24 |
| 25 | बुलढाणा | 1 | 25 |
| 26 | भंडारा | 1 | 26 |
| 27 | चंद्रपूर | 1 | 27 |
| | एकूण | 109 | |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य नॅब शाखा, नाशिक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार वर्ष 2011.

**निष्कर्ष :**

1) वरील तक्त्यात अंधांसाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील जिल्हावार संस्थांची संख्या दिलेली आहे. सर्वात जास्त संस्थांची नोंदणी मुंबई आणि नांदेड या जिल्ह्यात झालेली आहे (प्रत्येकी 10 संस्था)
2) प्रत्येकी 1 संस्था कोल्हापूर, नंदुरबार, उस्मानाबाद, अकोला, ठाणे, सिंधुदुर्ग, बुलढाणा, भंडारा व चंद्रपूर या ठिकाणी कार्यरत आहेत.
3) याशिवाय इतर जिल्ह्यांमध्ये 3 ते 7 संस्था कार्यरत आहेत.
4) नाशिक आणि लातूर जिल्ह्यात 9 संस्था कार्यरत आहेत.

**सारांश :**

यावरुन असे दिसते की, अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांची संख्या मुंबई, नाशिक, नांदेड, लातूर वगळता इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी कमी आहे. म्हणजेच संस्थात्मक पातळीवरदेखील प्रादेशिक असमतोल दिसून येतो.

**महाराष्ट्रातील अंधांची आणि अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांची जिल्हानिहाय संख्या**
**तक्ता क्र. 9**

| अ.क्र | जिल्हा | जिल्ह्यातील अंधांची एकूण संख्या | अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांची संख्या | प्रत्येक संस्थेमागील अंधांची सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | सोलापूर | 32920 | 7 | 4703 |
| 2 | पुणे | 38181 | 7 | 5454 |
| 3 | अहमदनगर | 20198 | 5 | 4040 |
| 4 | जळगाव | 25890 | 4 | 6472 |
| 5 | कोल्हापूर | 16850 | 1 | 16850 |
| 6 | नागपूर | 22368 | 5 | 4473 |
| 7 | लातूर | 9888 | 9 | 1098 |
| 8 | सातारा | 12706 | 5 | 2541 |
| 9 | अमरावती | 20113 | 5 | 4022 |
| 10 | नाशिक | 20014 | 9 | 2223 |
| 11 | मुंबई | 27551 | 10 | 2755 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | नांदेड | 16628 | 10 | 1662 |
| 13 | जालना | 10043 | 3 | 3347 |
| 14 | औरंगाबाद | 50603 | 5 | 10120 |
| 15 | बीड | 10848 | 3 | 3616 |
| 16 | धुळे | 8995 | 5 | 1799 |
| 17 | सांगली | 17527 | 4 | 4381 |
| 18 | हिंगोली | 5455 | 4 | 1363 |
| 19 | नंदुरबार | 4727 | 1 | 4727 |
| 20 | उस्मानाबाद | 9176 | 1 | 9176 |
| 21 | अकोला | 8127 | 1 | 8127 |
| 22 | ठाणे | 34361 | 1 | 34361 |
| 23 | सिंधूदूर्ग | 3155 | 1 | 3155 |
| 24 | बुलढाणा | 13074 | 1 | 13074 |
| 25 | भंडारा | 9566 | 1 | 9566 |
| 26 | चंद्रपूर | 19855 | 1 | 19855 |

**संदर्भ :**

1) भारताचा अपंग जनगणना अहवाल 2011
2) महाराष्ट्र राज्य नॅब शाखा नाशिक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार वर्ष 2011.

**निष्कर्ष :**

1) कोल्हापूर, नंदुरबार, उस्मानाबाद, अकोला, ठाणे, सिंधुदुर्ग, बुलढाणा, भंडारा, चंद्रपूर या सर्व जिल्ह्यात अंधांसाठी काम करणारी प्रत्येकी एकच संस्था आहे. त्यामुळे या जिल्ह्यातील सर्व अंधांच्या शिक्षण, प्रशिक्षण व सर्वांगीण पुनर्वनसनाचा भर हा त्या त्या जिल्ह्यातील एकाच संस्थेवर पडतो. परिणामी तेथील सर्व अंधांच्या शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसनावर लक्ष केंद्रित करणे तेथील संस्थांना जिकिरीचे होऊन बसते.
2) ठाणे जिल्ह्यातील अंधांची संख्या खूप जास्त म्हणजे 34361 इतकी असून जिल्ह्यात अंधांसाठी काम करणारी केवळ एकच संस्था असल्याने तेथील सर्व अंधांच्या शिक्षण, प्रशिक्षण व सर्वांगीण पुनर्वनसनाचा प्रचंड ार या एकाच संस्थेवर पडतो.
3) ठाणे जिल्ह्याच्या खालोखाल चंद्रपूर (अंधांची संख्या 19855) कोल्हापूर 16850) बुलढाणा (13074) भंडारा (9566) उस्मानाबाद (9176) अकोला (8127) नंदुरबार (4727) सिंधुदूर्ग (3155) या जिल्ह्यातील संस्थांवर तेथील सर्व अंधांच्या शिक्षण, प्रशिक्षण व सर्वांगीण पुनर्वसनाचा अनुक्रमे उतरत्याक्रमाने ार पडतो.
4) मुंबई, नांदेड, नाशिक, लातूर, सोलापूर, पुणे या जिल्ह्यात अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांची संख्या अनुक्रमे 10, 9, 7 अशी आहे. त्यामुळे तेथील अंधांच्या शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन आणि सर्वांगीण विकासाची जबाबदारी या संस्थांमध्ये वि ागली जाऊन तेथील अंधांच्या शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन व सर्वांगीण विकासाकडे जास्तीत जास्त लक्ष देणे तेथील संस्थांना शक्य होते.
5) ज्या जिल्ह्यात अंधांसाठी काम करणाऱ्या एकापेक्षा अधिक संस्था आहेत अशा जिल्ह्यांपैकी औरंगाबाद जिल्ह्यात अंधांची एकूण संख्या 50603 असून अंधांसाठी काम करणाऱ्या केवळ पाच संस्था जिल्ह्यात असल्याने 10120 अंधांमागे एक संस्था असे प्रमाण जिल्ह्यात असल्याचे आढळते.
6) लातूर, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यात अनुक्रमे 1098, 1362 आणि 1662 अंधांमागे काम करण्यासाठी सरासरीने एक संस्था असे प्रमाण आहे. त्यामुळे या संस्थांवर अंधांच्या शिक्षण, पुनर्वसन आणि सर्वांगीण विकासाचा त्या तुलनेत कमी ार पडतो. म्हणून या बाबतीत या जिल्ह्याची परिस्थिती इतर जिल्ह्याच्या तुलनेत चांगली असल्याचे आढळते.

**महाराष्ट्रातील अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांची गुणात्मक प्रगती**

**तक्ता क्र. 10**

| अ.क्र | जिल्हा | पगारी शिक्षकांची संख्या | गतीशिलता शिक्षकांची संख्या | क्षीण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दृ | संगीत शिक्षक | संगणक | शारीरिक | डॉक्टर | | | | |

| ष्टीक्षम शिक्षक | | प्रशिक्षक | शिक्षक | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नागपूर | 37 | – | 5 | 5 | 6 | – | – |
| 2 | अहमदनगर | 14 | 2 | 10 | 4 | 6 | 3 | – |
| 3 | अमरावती | 72 | 4 | 2 | 4 | 3 | 4 | – |
| 4 | लातूर | 25 | 6 | 6 | 5 | 6 | 5 | 2 |
| 5 | पुणे | 76 | 7 | 6 | 12 | 13 | 4 | – |
| 6 | हिंगोली | 15 | – | 2 | 3 | – | – | – |
| 7 | सोलापूर | 34 | 6 | 2 | 7 | 8 | – | – |
| 8 | सांगली | 8 | 2 | 1 | 4 | 3 | 1 | – |
| 9 | मुंबई | 108 | 6 | 13 | 9 | 11 | 5 | 4 |
| 10 | जळगाव | 17 | 3 | 1 | 2 | 2 | 3 | – |
| 11 | औरंगाबाद | 21 | – | – | 3 | 1 | 1 | 3 |
| 12 | धुळे | 20 | 1 | 1 | 2 | – | 1 | – |
| 13 | नांदेड | 62 | 5 | – | 8 | 4 | 9 | 8 |
| 14 | जालना | 13 | – | 3 | 1 | 1 | 1 | – |
| 15 | कोल्हापूर | – | – | – | – | – | – | – |
| 16 | नंदुरबार | 4 | – | – | 1 | – | 1 | – |
| 17 | अकोला | 10 | – | – | 1 | – | 1 | – |
| 18 | उस्मानाबाद | 5 | 1 | – | 2 | – | 1 | – |
| 19 | ठाणे | 23 | 11 | – | 4 | 3 | 1 | 3 |
| 20 | बीड | 12 | – | – | 2 | – | 2 | 2 |
| 21 | नाशिक | 54 | 35 | 30 | 8 | 5 | 5 | 3 |
| 22 | सातारा | 35 | 6 | – | 5 | – | 4 | 4 |
| 23 | चंद्रपूर | 39 | – | – | 6 | – | 3 | 3 |
| 24 | भंडारा | 3 | – | – | – | – | – | – |
| 25 | बुलढाणा | 9 | – | – | 2 | – | – | – |

**संदर्भ** : महाराष्ट्र राज्य नॅब शाखा नाशिक यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार वर्ष 2011.

**निष्कर्ष** :

1) अंधांच्या पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये त्यांना शिक्षण देण्यासाठी उत्तम शिक्षक असणे आवश्यक असते. तसेच अर्थशास्त्रीय तत्वानुसार कुठलेही काम करण्यासाठी प्रबळ आर्थिक प्रेरणा असणे हे महत्त्वाचे मानले जाते. वरील तक्त्यावरून असे दिसून येते की कोल्हापूर येथील संस्थेमध्ये पगारी शिक्षक अजिबात नाही. तर भंडारा, सिंधुदूर्ग, नंदुरबार, उस्मानाबाद, सांगली, बुलढाणा याठिकाणी पगारी शिक्षकांची संख्या दहा पेक्षाही कमी आहे.
2) मुंबईमध्ये अंधासांठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये पगारी शिक्षकांची संख्या सर्वाधिक म्हणजे 108 इतकी असून 50 पेक्षा अधिक पगारी शिक्षक असणाज्या संस्थांची संख्या अनुक्रमे नाशिक 54, नांदेड 62, अमरावती 72, पुणे 76 या जिल्ह्यात आहे.
3) उर्वरित जिल्ह्यातील अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांमधील पगारी शिक्षकांची संख्या दहापेक्षा अधिक आणि पन्नास पेक्षा कमी अशी आहे.
4) अंधांना डोळस व्यक्तींच्या मदतीशिवाय एका ठिकाणावरून दुसज्या ठिकाणी पांढज्या काठीच्या सहाय्याने जाता यावे यासाठी जे प्रशिक्षण दिले जाते त्याला गतीशिलता प्रशिक्षण (Mobility Training) असे म्हणतात. असे प्रशिक्षण देणाज्या शिक्षकांना गतीशिलता प्रशिक्षक (Mobility Instructor) असे म्हटले जाते. वरील तक्त्याचा विचार करता अहमदनगर 2, अमरावती 4, लातूर 6, पुणे 7, सोलापूर 6, सांगली 2, मुंबई 6, जळगाव 3, धुळे 1, नांदेड 5, उस्मानाबाद 1, ठाणे 11, नाशिक 35, सातारा 6. या जिल्ह्यात अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये गतीशिलता प्रशिक्षक कार्यरत आहेत. नागपूर, हिंगोली, औरंगाबाद, कोल्हापूर, नंदुरबार, अकोला, बीड, चंद्रपूर, भंडारा, बुलढाणा, सिंधुदूर्ग या जिल्ह्यातील अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये एकही गतीशिलता प्रशिक्षक नाही.

5) अंधांना योगासने, शारीरिक शिक्षण, मैदानी खेळ इत्यादींचे शिक्षण देण्यासाठी क्षीण दृष्टीक्षम शिक्षकांची आवश्यकता असते. वरील तक्त्यावरून असे दिसते की, औरंगाबाद, नांदेड, कोल्हापूर, नंदुरबार, अकोला, उस्मानाबाद, ठाणे, बीड, सातारा, चंद्रपूर, भंडारा, बुलढाणा, सिंधुदूर्ग या जिल्ह्यातील अंधसाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये क्षीणदृष्टीक्षम एकही शिक्षक नाही.
6) ब्रेल लिपीचा शोध लागण्यापूर्वीपासूनच अंधांना संगीताचे शिक्षण दिले जात असे. अंधांना स्वयंरोजगार प्राप्त करून देण्यात संगीत कलेचा मोठा वाटा आहे. वरील तक्त्यावरून असे दिसून येते की भंडारा, कोल्हापूर आणि सिंधुदूर्ग या जिल्ह्यातील अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये एकही संगीत शिक्षक नाही ही चिंतेची बाब आहे. उर्वरित जिल्ह्यातील अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये संगीत शिक्षक कमी अधिक संख्येने का होईना पण कार्यरत आहे ही गोष्ट स्वागतार्ह आहे.
7) बौद्धिक आणि मानसिक विकासाबरोबरच अंधांचा शारीरिक विकासही योग्य प्रकारे होण्यासाठी अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये शारीरिक शिक्षक कार्यरत असणे अतिशय गरजेचे आहे. वरील तक्त्याच्या अध्ययनावरून असे आढळून येते की, नागपूर, हिंगोली, सोलापूर, कोल्हापूर, नंदुरबार, भंडारा, बुलढाणा, सिंधुदूर्ग या जिल्ह्यातील अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये एकही शारीरिक शिक्षक नाही ही अतिशय गंभीर बाब आहे.
8) आधुनिक स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी अंध व्यक्तींना संगणक शिक्षण देणे अतिशय महत्त्वाचे आहे. आधुनिक संगणक युगात संगणकाचे शिक्षण आणि ज्ञान नसणाऱ्या व्यक्तीला निरक्षर मानले जाते. वरील तक्त्याच्या अभ्यासावरून असे दिसून येते की हिंगोली, कोल्हापूर, नंदुरबार, अकोला, भंडारा, बुलढाणा, सिंधुदूर्ग या जिल्ह्यातील अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये एकही संगणक शिक्षक नाही. ही चिंतेची बाब आहे. उर्वरित सर्व जिल्ह्यातील अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये संगणक शिक्षक कार्यरत आहेत ही अतिशय समाधानाची बाब आहे.
9) अंधांच्या शारिरीक आणि मानसिक आरोग्याची वेळोवेळी तपासणी करण्यासाठी अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये डॉ. कार्यरत असणे अतिशय महत्त्वाचे आहे. वरील तक्त्याचा विचार करता औरंगाबाद, लातूर, मुंबई या जिल्ह्यातील संस्था वगळता उर्वरित सर्व जिल्ह्यातील अंधांसाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये एकही डॉक्टर कार्यरत नाही ही अतिशय गंभीर बाब आहे.

**संदर्भ :**

1) महाराष्ट्रातील अंधांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास : 2011 महाराष्ट्र राज्य नॅब शाखा नाशिक यांनी महाराष्ट्रातील अंधांसाठी काय करणाऱ्या संस्थांच्या केलेल्या सर्वेक्षणानुसार.